पाटबंधारे प्रकल्पांवरील कालवे या
विषयाची व्हिडिओ फिल्म बनविणेबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन परिपत्रक क्र. मेटाना-२०१८/(प्र.क्र.२४९/१८/लाक्षेवि (आस्था)
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई. ४०० ०३२.
दिनांक:-३० नोव्हेंबर, २०१८.

वाचा : १) जलसंपदा विभाग, शासन परिपत्रक, क्र. मेटाना २०१४ / प्र.क्र. ६३/२१४/लाक्षेवि (आस्था) दि. १८.०३.२०१७

प्रस्तावना-

जलसंपदा विभागाच्या कामांची व्याप्ती पाहता सर्वच कामांचे सखोल ज्ञान व अनुभव अभियंत्याला असेलच याची शाश्वती नाही. त्यामुळे त्याला आपल्या सहकारी व वरिष्ठांवर मार्गदर्शनासाठी अवलंबून रहावे लागते. असे मार्गदर्शन प्राप्त न झाल्यास कामामध्ये चुका घडण्याची शक्यता आहे. तसेच प्रशिक्षणा दरम्यान चांगले प्रशिक्षक/व्याख्याते प्राप्त न झाल्यास पुरेशी माहिती अथवा ज्ञान मिळण्याची शक्यता दुरावते. या सर्व पार्श्वभमीवर विभागातील विविध विषयांचे/बांधकामांचे उच्च दर्जाचे व्हिडीओ बनविल्यास त्याचा फायदा सर्वच घटकांना मिळू शकेल. हे व्हिडीओ बनविताना चांगल्या दर्जाचे animation, कामाचे चित्रीकरण, तसेच परिणामकारक संवाद (Good narration) असलेले व्हिडीओ तयार करुन You Tube सारख्या प्लॅटफॉर्मवर उपलब्ध करुन दिल्यास कोणत्याही व्यक्तीला विषयानुरुप माहिती/मार्गदर्शन घेण्याची गरज भासल्यास त्याला असे व्हिडीओ पाहून पुष्कळशी माहिती उपलब्ध करुन घेता येईल व अचूक परिणामकारक काम होऊन जलसंपदा विभागाच्या कामाची गती व दर्जा वाढू शकेल. पाटबंधारे प्रकल्पावरील कालवे या विषयाची व्हिडीओ फिल्म बनविण्याकरिता समिती गठित करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. त्यानुसार पूढील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन परिपत्रक:-

या पार्श्वभूमीवर "पाटबंधारे प्रकल्पांवरील कालवे" या विषयाची व्हिडीओ फिल्म बनविण्याबाबत खालील अधिकाऱ्यांची समिती स्थापन करण्यात येत आहे.

१) महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी), नाशिक .. अध्यक्ष
२) अधिक्षक अभियंता, कालवे संकल्पचित्र संघटना, नाशिक .. सदस्य सचिव

३) अधिक्षक अभियंता, ई-प्रशासन मंडळ, पुणे .. सदस्य

४) क्षेत्रिय अधिक्षक अभियंता-

१) श्री. प्रसाद नार्वेकर, अधिक्षक अभियंता, गोसीखुर्द उपसा सिंचन मंडळ, अंबाडी (भंडारा) .. सदस्य

२) श्री.प्रवीण कोल्हे, अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, पुणे. .. सदस्य

५) अधिक्षक अभियंता ,गुण नियंत्रण मंडळ, नागपूर, पुणे व औरंगाबाद .. सदस्य

६) शासकीय किंवा खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालयातील २ प्राध्यापक (महासंचालक, मेरी, नाशिक यांनी प्रस्तावित केलेले) .. सदस्य

७) डॉ . हितेंद्र चांदेवार, स्वेच्छानिवृत्त कार्यकारी अभियंता ,नागपूर. .. सदस्य

वर नमूद अधिकाऱ्यांच्या समितीने पाटबंधारे प्रकल्पावरील कालवे या विषयांतर्गत या ४ मुद्दयाना धरुन एक उच्च दर्जाची व्हिडीओ फिल्म तयार करावी जेणेकरुन ती फिल्म सगळयांना मार्गदर्शक स्वरुपाची राहील.

१) कालव्यावरील मातीकाम ( Canal Earthwork)

२) कालव्यावरील विविध प्रकारची बांधकामे (Various types of structure on canal)

३) कालव्याचे अस्तरीकरण (Lining of Canal)

४) बंदिस्त पाईपलाईन (Underground pipe distribution network)

सदर व्हिडीओ फिल्म ३ महिन्यांच्या कालावधीत तयार करावी. ही व्हिडीओ फिल्म You Tube सारख्या संकेतस्थळावर अपलोड करावी जेणेकरुन याचा फायदा अभियंत्यांना त्यांच्या नियमित कामकाजात होईल.

उपरोक्त प्रमाणे व्हिडीओ फिल्म बनविण्यासाठी प्रोफेशनल व्हिडीओग्राफर, संवादक, प्राध्यापक यांचे मानधन इत्यादीसाठी लागणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक मेरी, नाशिक यांनी तयार करावे व खर्चाची प्रतिपूर्ती गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद व विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांनी सम प्रमाणात करावी.

11 DEC 2018
अधीक्षक अभियंता
पुणे पाटबंधारे प्रकल्प
मंडळ, पुणे

| | |
|---|---|
| अ.अ. | |
| उप अ.अ. | |
| अधीक्षक | |
| वर्गीकरण | |
| आवक क्र. | |
| तारीख | |

30/11/18

(र. ग. पराते)

उप सचिव (लाक्षेवि)

प्रत:-
१) प्रधान सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.३२
२) सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.३२
३) सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.३२
४) महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी), नाशिक
५) सर्व कार्यकारी संचालक, पाटबंधारे विकास महामंडळ, जलसंपदा विभाग
६ ) अधिक्षक अभियंता, कालवे संकल्पचित्र संघटना, नाशिक
७) अधिक्षक अभियंता, ई-प्रशासन मंडळ, पुणे
८) श्री. प्रसाद नार्वेकर, अधिक्षक अभियंता, गोसीखुर्द उपसा सिंचन मंडळ, अंबाडी (भंडारा)
९) श्री.प्रवीण कोल्हे, अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, पुणे.
१०) अधिक्षक अभियंता ,गुण नियंत्रण मंडळ, नागपूर, पुणे व औरंगाबाद.
११) डॉ. हितेंद्र चांदेवार, स्वेच्छानिवृत्त कार्यकारी अभियंता. नागपूर